शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८वी

विषय – मराठी (प्रथम भाषा)

घटक 1 – आकलन

भारांश – 24% प्रश्नसंख्या – 6 एकूण गुण 12

1.3 सुसंगत वाक्याचा परिच्छेद

- हे लक्षात ठेवा.
  - यामध्ये सर्व वाक्यांचा एकमेकांशी संबंध असतो.
  - एखाद्या विषयाशी संबंधित ही वाक्य असतात.
    - परिच्छेदाची सर्व वाक्य प्रथम काळजीपूर्वक वाचा. परिच्छेदातील शेवटच्या वाक्यावरूनही सर्व उत्तरे स्पष्ट होऊ शकतात.
    - पूर्ण परिच्छेद वाचल्याशिवाय उत्तरे नोंदवू नका.
    - वाक्याच्या अर्थावरून त्याला योग्य असणाराच पर्याय निवडा.
    - या प्रश्नात किमान तीन वाक्याचा परिच्छेद दिला जातो.

प्र. 1 ते 3 पुढील वाक्यांचा सुसंगत परिच्छेद करण्यासाठी गाळलेल्या जागांसाठी योग्य शब्द निवडा आणि त्याच्या पर्याय क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.

1) अचानक ....पाऊस कोसळला.

1) मोसमी 2) हस्त नक्षत्राचा 3) मृग नक्षत्राचा 4) अवकाळी

उत्तर – पर्याय क्र. 4

2) त्यामुळे जगाचा पोशिंदा ....

1) सुखावला 2) हवालदिल झाला

3)आनंदाने नाचू लागला. 4)कंठशोष करू लागला.

उत्तर –पर्याय क्र. 2

3) शेतीची अपरिमित झालेली हानी पाहून शासनाने त्यांना .... मदत केली.

1) रेखीव 2) भौतिक 3) भरीव 4) भावनिक

उत्तर –पर्याय क्र. 3

स्पष्टीकरण – वरील परिच्छेद पूर्ण वाचल्यानंतर असे लक्षात येते की पाऊस अचानक व अवेळी आला असेल. अवेळी पडलेल्या पावसाला अवकाळी पाऊस म्हणतात. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले आहे. या मोठया नुकसानीने तो हताश म्हणजेच हवालदिल झाला आहे. नुकसान मोठे असल्यामुळे शासनाने भरीव म्हणजेच मोठी मदत त्यांना केली आहे. परिच्छेदाचा विषय लक्षात घेऊन तीनही वाक्यांचा एकमेकांशी संबंध लक्षात घेतल्यावर सर्व उत्तरे स्पष्ट होतात.

1.4 संवाद

➢ हे लक्षात ठेवा.

- दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये होणारे बोलणे म्हणजे संवाद.
- संवाद काळजीपूर्वक वाचा.
- संवाद कोठे घडला ?कोणत्या वेळी घडला?संवादाचा विषय काय होता ? संवाद कोणाकोणांत झाला ? या बाबी काळजीपूर्वक ध्यानात घ्या कारण या तपशीलावरच प्रश्न विचारले जातात.
- संवादामध्ये तर्कज्ञानाचा अचूक वापर करणे महत्त्वाचे असते.
- संवादावर किमान तीन प्रश्न विचारले जातात.

प्र. 1ते 3 पुढील संवाद वाचून त्यापुढे दिलेल्या प्रत्येक प्रश्नाच्या योग्य उत्तराच्या पर्याय क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.

"शाहीर, तुम्ही केव्हापासून गाता?"

"गाण्याचा प्रयत्न करतो, अण्णा, बस्स!"

"तुम्ही फार चांगलं गाता. तुमचा बुलंद पहाडी आवाज मलाही फार आवडतो."

"अण्णा भाऊ, तुम्ही थोर साहित्यिक आहात. आपल्या दर्शनाने मी धन्य झालो."

"आता आपली गट्टी जमली. माझ्याकडे येत चला."

"विठ्ठला, जगलो वाचलो तर तुला रशियाला घेऊन जाईन म्हणतो."

"अण्णा, मॉस्को शहरात आपल्या कादंबऱ्यांचं तिथल्या भाषेत अनुवाद झालेत, असं मी ऐकलंय."

"होय बाबा खरं हाय तुझं."

"मॉस्कोमध्ये आपल्या कादंबऱ्यांच्या अनुवादाचं अमाप असं मानधन तिथल्या बँकेत आहे, असंही म्हणतात."

"होय, म्हणतात तर खरं."

"तुम्ही ते मानधन मिळवा, अन् आलिशान बंगला बांधा."

"बंगला, बाग, रुबाब या साधनांचा मला मोह नाही, बाबा. त्या संपत्तीनं मी बिघडून जाईन. गरीबीला विसरून जाईन. सत्य लिखाणाला पारखा होईन; म्हणून मला ते मानधन नको."

1) संवादात किती व्यक्तींनी भाग घेतला आहे?

1) 5 2) 4 3) 3 4) 2

उत्तर – पर्याय क्र. 4

स्पष्टीकरण – वरील संवादामध्ये प्रत्येक वाक्य व्यवस्थित जर पाहिले तर शाहीर आणि अण्णाभाऊ या दोघांमध्येच संवाद झाल्याचे दिसून येते.

2) अण्णा भाऊ यांच्या साहित्याचे कोणत्या भाषेत रूपांतर झाले आहे?

1) रशियन 2) फ्रेंच 3) इंग्रजी 4) जपानी

उत्तर – पर्याय क्र. 1

स्पष्टीकरण – रशियातील मॉस्को मध्ये तिथल्या स्थानिक भाषेत कादंबऱ्यांचा अनुवाद झाल्याचा उल्लेख संवादामध्ये आला आहे. याचा अर्थ तेथील रशियन भाषेत कादंबऱ्यांचे भाषांतर झाले आहे असा होतो.

3) संवादातील अण्णांचा स्वभाव कसा आहे?

1) मानी 2) प्रखर वास्तववादी 3) समाधानी 4) देशाभिमानी

उत्तर – पर्याय क्र. 2

स्पष्टीकरण – संवादातील शेवटच्या दोन ओळीत अण्णांचा स्वभाव स्पष्ट होतो. संपत्तीनं बिघडून जाण्याची, गरिबीला विसरण्याची आणि सत्य लिखाणापासून दूर जायची अण्णांची तयारी नाही. याचा अर्थ ते प्रखर वास्तववादी आहेत.

विद्यार्थी अभिप्राय

नमस्कार ,मी अनुष्का. इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत पुणे जिल्ह्यात प्रथम तर राज्यात द्वितीय क्रमांकाने यशस्वी झाले. यात मराठी विषयाचा मोठा वाटा आहे.

सराव पेपर सोडवताना प्रत्येक प्रश्नावर वर्गात विचार केला जायचा. वर्गशिक्षक श्री. गोरक काळे सर यांनी व्याकरणाच्या विविध घटकांचा विशेष सराव वर्गात घेतला. इयत्ता 5वी ते 8वीच्या पाठ्यपुस्तकातील शब्दसंपत्तीवर विशेष भर दिला. याचा परिणाम म्हणजे कठीण समजल्या जाणाऱ्या मराठी पेपर मध्ये मी 50 पैकी 48 गुण मिळवू शकले. व्याकरणातील विविध घटकांचे आकलन आणि शब्द संपत्तीवर जाणीवपूर्वक विशेष लक्ष दिल्यास या विषयातील यश नक्कीच दूर नाही.

कु. अनुष्का भाऊसाहेब वाबळे. इयत्ता 8वी

शिष्यवृत्ती परीक्षा 2025– 286 गुण –ग्रामीण विभागातून राज्यात दुसरी

जि. प. प्राथ. शाळा वाबळेवाडी. ता. शिरूर जि. पुणे.

(Q. R. कोड मध्ये द्यावेत.)

अंतिम परीक्षेत विचारले गेलेले काही प्रश्न –

पुढील सुसंगत वाक्यांचा परिच्छेद अर्थपूर्ण होण्यासाठी योग्य पर्यायांची निवड करा. (2019)

प्र. 1. ……………… ही समाजजीवनाला लागलेली कीड आहे.

1) अज्ञान 2) आळस 3) निरक्षरता 4) व्यसन

प्र. 2. तिचा …………करणे ही काळाची गरज झाली आहे.

1) विकास 2) नायनाट 3) अपभ्रंश 4) भ्रमनिरास

प्र. 3. कारण आजची तरुण पिढी तिच्या आहारी गेल्याने….

1) उत्कर्षाकडे निघाली आहे 2) अधोगतीकडे निघाली आहे

3) सुसंस्कारित झाली आहे 4) रोमहर्षित झाली आहे

प्र. 4ते 6 पुढील सुसंगत वाक्यांचा परिच्छेद अर्थपूर्ण होण्यासाठी योग्य पर्यायांची निवड करा. (2025)

प्र. 4. …………. हे एक सुगंधित फूल आहे.

1) गुलाब 2) केवडा 3) पारिजातक 4) निशिगंध

5. हिरव्यागार …………ही फुले हारीने येतात.

1) छडीवर 2) वेलीवर 3) खोडावर 4) तृणपात्यांवर

6. या फुलाला ....असेही म्हणतात.

1) राजेश्री 2) प्राजक्त 3) केतकी 4)गुलछडी

प्र.7ते 9 साठी सूचना–

पुढील संवाद काळजीपूर्वक वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे पर्यायातून निवडा. (2018)

"अहो अण्णा, तुम्ही मुलगा यायची वाट पाहू नका, चला उचला आबांना."

"आरं तात्या, आपण कसा निर्णय घ्यायचा?"

"अण्णा, दादाला खूप उशीर होणार आहे, आम्ही आहोत बरोबर, पण चला लवकर दिवे लागणीची वेळ झाली."

"बरं शांता."

"हे घ्या तात्या पैसे, पोरानं पाठवले होते गेल्या महिन्यात."

"अगं आई, आहेत माझ्याकडं, तू नको काळजी करू."

"असावत जास्त–कमी दवाखान्याचं काम हाय"

"नको धोंडूनाना, तुम्ही चला, घ्या माझ्या गाडीत."

"अगं शांता, तू तुझ्या घरी जा, मी जावईबापूंच्या गाडीतून ह्यांना घेऊन जाते."

"अगं, तू कशाला? आम्ही आहोत ना, तू घरीच थांब."

"तात्या, अण्णा तुम्ही जा बरं यांच्याबरोबर" आई म्हणाली.

प्र. 7. वरील संवादात किती जणांनी भाग घेतला आहे?

1) पाच 2) सात 3) चार 4) सहा

प्र. 8. वरील संवाद कोणत्या ठिकाणी झाला असावा ?

1) धोंडूनानांच्या घरी 2) आबाच्या घरी

3) दवाखान्यात 4) जावईबापूंच्या घरी

प्र. 9. वरील संवादाची वेळ कोणती असावी ?

1) सकाळी 2) दुपारी

3) संध्याकाळी 4) निश्चित सांगता येत नाही.

उत्तरे –

प्रश्न	पर्याय क्रमांक
1. –	4
2. –	2
3. –	2
4. –	4
5. –	1
6. –	4
7. –	1
8. –	2
9. –	3